गैरअर्जदार महावितरण तर्फे असे कथन केले 25560 युनीट ची Assessment भरारी पथक उस्मानाबादच्या स्थळतपासणी अहवालानुसार meter display बंद असल्याने Electricity Act 2003 कलम 126 नुसार दिली. त्यावरती ग्राहकाने केलेल्या तक्रारीनुसार पत्र क्रमांक २२३ दि.१७.०५.२०१६ रोजी कळविण्यात आले, या ग्राहकाच्या कनेक्शन साईट वरती त्यांचे प्रतिनिधी उपलब्ध नसतात. त्यामुळे ग्राहकाने केलेली sop ची मागणी आम्हाला मान्य नाही व दिलेले बिल बरोबर असुन ते दुरुस्त करण्याचे प्रश्न येत नाही. विद्युत पुरवठा खंडीत केल्यानंतर सदर कनेक्शनचा वापर करण्यासाठी केलेला डिझेल वरील खर्च आम्हाला मान्य नाही सदरची मागणी रद्द करावी.

अर्जदार यांनी असे कथन केले की आमचे प्रतिनिधी जाग्यावर हजर नसतात त्यामुळे महावितरणने disconnection notice दिली नाही. वास्तवीक पाहता त्यांनी नोटीस काढलीच नाही व तसा प्रयत्न ही केला नाही. तर ग्राहक प्रतिनिधी जाग्यावर नसला तर Electricity Act 2003 नुसार कार्यवाही करणे आवश्यक होते. यावरुन त्यांनी Electricity Act 2003 उल्लंघन केले आहे.

गैरअर्जदार महावितरण यांचे पत्र क्र.-Se/O'bad/Ts/1133 दि.20.02.2017 जा.क्र./उ.का.अ./वाशी/लेखा./८७७दि.१४.०२.२०१७व ग्राहक अर्जदार यांची अ फॉर्ममधील ०३.०१.२०१७ रोजीच्या तक्रारीमध्ये नमुद केलेनुसार मंचाने दिनांक १७.०५.२०१७ रोजी Intreim order दिली त्यानुसार अर्जदार यांनी रु.५४६७० रुपये भरल्याने दिनांक २४.०७.२०१७ रोजी अर्जदार ग्राहकाचा विद्युत पुरवठा चालु करुन देण्यात आला. त्याच बरोबर सदर ग्राहकाचा meter हा Genus Meter manufacturing company कडे analysis करण्यासाठी पाठविला होता. या meter चा data download होत नसल्याचे चौकशीमध्ये गैरअर्जदारातर्फे दिनांक १२.१०.२०१७ रोजी सांगण्यात आले.

गैरअर्जदार महावितरण तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री. शेंद्रे यांनी असे कथन केले की दि.२१.०४.२०१६ च्या अतिरिक्त कार्यकारी अभियंता भरारीपथक उस्मानाबाद यांच्या report नुसार १२ महिन्याचे एकुन २५५६० units होतात. त्यांनी पुर्वी भरलेले १५६०० units वजा जाता ९९४१ units ची assessment एप्रील १६ च्या बिलात देणात आली. तसेच ग्राहकाच्या बिल दुरुस्तीच्या अर्जास १७.०५.२०१६ रोजी बिल बरोबर असल्याचे कळविले.

अर्जदार प्रतिनिधी यांनी असे कथन केली की सदरचे कनेक्शन हे थ्री फेज आहे त्याचा load हा मोबाईल टॉवर साठी वापरला जातो. त्यावरील भर हा constant load आहे. भरारी पथकाच्या पहाणी नंतर एप्रील१६ मध्ये मिटर बदलला व तो फेब्रुवारी १७ पर्यत चालु होता त्याचा वापर व पुर्वीचा वापर साधारणपणे एकच आहे. कारण त्याठिकाणी ऑपरेटर असतात त्यामुळे load changeहोण्याचा प्रश्न नाही. भरारी पथकाने कोणत्याही परीपत्रकाचा आधार न घेता सदर चे assessment दिले आहे. ज्या कालावधीचे average assessment देण्यात आली आहे त्या १२ महीन्याचे बिल हे मिटर प्रमाणे देण्यात आले आहे. त्यामुळे meter सुस्थितीत आहे अशा मिटरवर assessment देणे पुर्णपणे चुकीचे आहे. Flying squad यांनी खोटा report सादर केला आहे. Sop प्रमाणे उपकार्यकारी अभियंता यांनी बिलाची दुरुस्ती ७ दिवसात करणे क्रमप्राप्त आहे.तसेच त्यांनी विना नोटीस आमचा विद्युत पुरवठा बंद केला.